International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# ऊस दर आणि एफ आर पी

**प्रा. दीपक पाटील**

*कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड*

*ता. चंदगड, जि. कोल्हापूर*

***Corresponding Author - प्रा. दीपक पाटील***

**DOI - 10.5281/zenodo.10967484**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीक्षेत्राचे अनन्य साधारण महत्व आहे. आजही देशातील एकूण रोजगारामध्ये शेतीचा वाटा ४८% आहे. जवळपास ५५ ते ६०% लोकसंख्येचे अर्थशास्त्र शेतीवर अवलंबून आहे. जवळपास १७% राष्ट्रीय उत्पन्न शेतीमधून निर्माण होते. पण शेतमाल बाजारपेठेत किंमत स्थैर्य नसल्याने शेती उत्पादकांनाही आर्थिक स्थैर्य लाभताना दिसत नाही. शेती मालाचा उत्पादन खर्च ठरवून त्याआधारे किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी १९६५ पासून 'राष्ट्रीय कृषी खर्च आणि मूल्य आयोग' कार्यरत आहे. या आयोगाद्वारे जवळपास २३ पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या जातात. मात्र ज्या उत्पादन खर्चावर हे भाव निश्चित केले जातात तो खर्च काढण्याची पध्दतच मुळात सदोष असल्याने जाहीर केली जाणारी किमान आधारभूत किंमत वास्तव उत्पादन खर्च भरुन निघण्यास पुरेशी नसल्याचे अनेक अभ्यासकांचे मत आहे.

अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत एम.एस.पी आणि ऊसाची उचित व लाभकारी किंमत (एफ आर पी) ठरविण्यासाठी कृषी मूल्य आयोग आहे. साखर उद्योगातील सर्व घटक एफ आर पी भोवती केंद्रित झालेले आहेत. FRP (Fair and Remunerative Price) म्हणजे शेतकऱ्यांच्या ऊसाला दिला जाणारा रास्त व किफायतशीर दर होय. २००९ पूर्वी ऊस नियंत्रण कायदा १९६६ च्या कलम तीन मधील तरतुदीनुसार केंद्र सरकारसाखरेच्या प्रत्येक हंगामातील ऊसाचा किमान वैधानिक भाव म्हणजेच एस एम पी (Statutory Minimum Cane Price) निश्चित करत असे पण सरकारने २२ आक्टोबर २००९ रोजी ऊस नियंत्रण कायद्यात ऊस उत्पादकांचा खर्च लक्षात घेऊन माफक नफा मिळवण्याची तरतूद केली आहे. ऊसाचा एकूण उत्पादन खर्च व त्यावरील साधारण पंधरा टक्के नफा गृहीत धरुन एफ आर पी ठरवली जाते.

**ऊस नियंत्रण आदेश :**

शेतकऱ्याला ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील ३१ तरतुदीनुसार एफ आर पी दिली जाते.

या नियमानुसार कोणत्याही कारखान्याला एफ आर पी पेक्षा कमी दराने ऊस खरेदी करता येते तसेच कमी दर देत करार ही करता येत नाही. ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील ३(३) मधील तरतदीनुसार कोणत्याही कारखान्याने शेतकऱ्याचा ऊस खरेदी केल्यानंतर १४ दिवसाच्या आत एफ आर पी रक्कम द्यावी लागते.


कारखान्याने १४ दिवसाच्या आत एफ आर पी दिली नसल्यास ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील ३(३) (ए)नुसार कारखान्याला पंधरा टक्के व्याजासह एफ आर पी रक्कम द्यावी लागते. शेतकऱ्याला कारखान्याने वेळेत एफ आर पी न दिल्यास संबंधीत कारखान्यावर आर आर सी (महसूल वसुली प्रमाणपत्र) कारवाई करण्याच्या अधिकार साखर आयुक्ताला आहे.

एफ आर पी १४ दिवसाच्या देण्याचे बंधन कारखान्यावर आहे पण कारखाने शेतकऱ्याकडे लेखी करार करुन ही रक्कम लांबवू शकतात.

**महाराष्ट्र ऊस दर अधिनियम २०१३ :**

महाराष्ट्र मध्ये ऊस दराचे विनियमन अधिनियम २०१३ असा कायदा राज्यातील शेतकऱ्यासाठी महाराष्ट्र शासनाने केला आहे कारण महाराष्ट्र मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांची चळवळ व्यापक प्रमाणात आहे. विशेषतः राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एक संघ करण्याचे काम केले. ऊसाचे अर्थशास्त्र शेतकऱ्यांसमोर मांडले. त्यामुळे महाराष्ट्र शासनाला ऊस प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करणे भाग पडले. त्याचा परिणाम ऊस दराचे विनियमय अधिनियम २०१३ मध्ये झाला या कायद्याच्या आठव्या कलमाद्वारे ऊसदर निश्चित करण्यासाठी काही निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषानुसार शेतकऱ्यांना ऊस दर ठरवताना साखरेपासून तसेच उप पदार्थापासून कारखान्याला मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास केला जातो. आणि अधिकचा फायदा शेतकऱ्यांना वाटून दिला जातो. रेव्हेन्यू शेअरिंग फार्मूला (RSF) हा रंगराजन समितीने ठरविला आहे. त्या समितीच्या कार्यपध्दतीनुसार साखर विक्री मूल्याच्या ७५% किंवा साखर व उपपदार्थ (मळी, भुसा, प्रेसमेड) या दोन्हींच्या विक्रीतून मिळालेल्या ७०% मूल्यापैकी जे जास्त असेल ते मूल्य हे आर एस एफ गणले जाते. एफ आर पी पेक्षा आर एस एफ रक्कम जास्त निघत असेल तर ती द्यावी लागते याचा अर्थ एफ आर पी पेक्षा कमी रक्कम कारखान्याने देण्यास मनाई आहे.

२०१३-१४ च्या साखर हंगामापासून आतापर्यंत केंद्र सरकारने जाहीर केलेली एफ आर पी ची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे.




सरकारने एफ आर पी मध्ये वाढ करत असताना बेस रेट वारंवार बदलला आहे. सुरुवातीला ८.५% असणारा बेसरेट नंतर ९.५% करण्यात आला. आणि परत त्यामध्ये वाढ करुन तो सध्या १०.२५% करण्यात आला आहे. बेसरेट वाढीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

**शेतमालाचे दर – असमतोल धोरण :**

शेतीमालाचे दर ठरवत असताना समतोल धोरण राबविले पाहिजे. १९७१-७२ ला ऊसाचा दर १७५ रुपये प्रतिटन कापूस २५० रुपये प्रति क्विंटल हळद २०० रुपये प्रतिक्विंटल होता. त्यावेळी सोन्याचा भाव २४० रुपये तोळा होता. याचा बाजारातील समतोल धोरणाशी ताळमेळ घालताना दीड टन ऊस विकला की एक तोळा सोने येत होते. शासकीय चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याला महिना पगार १७५ रुपये वरिष्ठ लिपिकाला २२५ रुपये प्राध्यापकांना ६०० रुपये पगार होता. आजही सोन्याचा दर आणि शासकीय नोकरांच्या पगारामध्ये समतोल धोरण दिसून येते. परंतु शेतकऱ्यांच्या दराशी तुलना करता त्यामध्ये २० ते २२ पट तफावत असल्याचे जाणवते. त्यामुळे शेतीमालाचे दर ठरवत असताना बाजारात असणाऱ्या इतर घटकांशी समतोल पध्दतीने शेती मालाचे दर वाढले पाहिजेत.

शेतकऱ्याच्या मालाचे दर वाढविताना देशातील गोर-गरिब घटकांचा विचार केला जातो. पण साखरेच्या बाबतीत विचार केला तर साखर ही जीवनावश्यक आहे. परंतु एकूण उत्पन्नापैकी फक्त १८ ते २०% इतकीच साखर जीवनावश्यक गरज म्हणून वापरली जाते. उर्वरीत ८०% साखर ही शीतपेय, मिठाई, मेडिसीन, केमिकल इत्यादी औद्योगिक व व्यापारी कारणासाठी वापरली जाते. त्यातून या कंपन्या प्रचंड नफा कमावतात आणि शेतकऱ्याला मात्र एफ आर पी वरच समाधान मानावे लागते.

**ऊस नियंत्रण आदेश :**

शेतकऱ्यांना ऊस नियंत्रण आदेश १९१६ मधील ३ (१) तरतुदीनुसार एफ आर पी दिली जाते. ती कायदेशीर तरतूद आहे.

या नियमानुसार कोणत्याही कारखान्याला एफ आर पी पेक्षा कमी दराने ऊस खरेदी करता येत नाही. तसेच कमी दर देत करार ही करता येत नाही.

ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील ३(३) तरतुदीनुसार कोणत्याही कारखान्याने शेतकऱ्याचा ऊस खरेदी केल्याच्या दिवसांपासून १४ दिवसाच्या आत एफ आर पी द्यावीच लागते.

कारखान्याने १४ दिवसाच्या आत एफ आर पी दिली नसल्यास ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील ३(३)(९) नुसार कारखान्याला १५% व्याजासह एफ आर पी द्यावा लागतो.

शेतकऱ्याला कारखान्याने वेळेत एफ आर पी न दिल्यास या कारखान्यावर आर आर सी (महसूल वसुली प्रमाणपत्र) कारवाई करण्याचे अधिकार साखर उत्पादकात आहेत.

**शेतमालाचे दर – असमतोल धोरण :**

शेतीमालाचे दर ठरवत असताना समतोल धोरण राबविले पाहिजे. १९७१-७२ ला ऊसाचा दर १७५ रुपये प्रतिटन कापूस २५० रुपये प्रति क्विंटल हळद २०० रुपये प्रतिक्विंटल त्यावेळा सोन्याचा भाव होता. २४० रुपये तोळा याचा बाजारातील समतोल धोरणाशी ताळमेळ धावताना दीड टन ऊस विकला की एक तोळा सोने येत होते. शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला महिना पगार १७५ रुपये कनिष्ठ लिपिकाला २२५ रुपये प्राध्यापकाना ६०० रुपये पगार होता. आजही सोन्याचा दर आणी शासकीय नोकरांच्या पगाराची केली तर समतोल धोरण दिसून येते. परंतु शेतकऱ्यांच्या दराशी तुलना करता त्यामध्ये २० ते २२ पट तफावत असल्याचे जाणवते. त्यामुळे शेतीमालाचे दर ठरवत असताना बाजारात असणाऱ्या इतर घटकांशी समतोल पध्दतीने शेती मालाचे दर वाढले पाहिजेत.

शेतकऱ्यांच्या मालाचे दर वाढविताना देशातील गोर-गरीब घटकांचा विचार केला जातो. पण साखरेच्या बाबतीत विचार केला तर साखर ही जीवनावश्यक आहे. परंतु एकूण उत्पन्नापैकी फक्त १८ ते २०% इतकीच साखर जीवनावश्यक गरज म्हणून वापरली जाते. उर्वरीत ८०% साखर ही शीतपेय, मिठाई, मेडीसिन, केमिकल इत्यादी औद्योगिक व व्यापारी कारणासाठी वापरली जाते. यातून या कंपन्या प्रचंड नफा करतात. आणि शेतकऱ्याला मात्र एफ आर पी वरच समाधान मानावे लागते.

**संदर्भ :**


1. दै. तरुण भारत २०/१२/२०१३
2. दै. सकाळ २७/२/२०२४
3. दै. महानकार्य ८/३/२०२४
4. मा. राजू शेट्टी शिवार ते संसद
5. दै. सकाळ २/३/२०२४
6. दै. लोकमत ८/२/२०२४
7. योजना, अर्थसंवाद दै. पुढारी, ॲग्रोवन
8. मा. प्रा. जालंधर पाटील यांची मुलाखत
9. ऊस दराचे विनियमन अधिनियम २०१३